# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 22/07/2021 (गुरूवार)

(दुपार)

---

### जनावरांची अवैधरीत्या बाळगुण ठेवणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

1) पो.स्टे. मौदा :— अंतर्गत 10 कि. मी. अंतरावरील वडोदा शिवार ते कामठी येथे दिनांक 21/07/2021 चे 08.00 वा. दरम्यान पो.स्टे. मौदा येथील स्टाफ वडोदा शिवारात गेले असता घटनास्थळी जनावरांची बारकाइने पाहणी केली असता एकच दोरीचे दावनीला सहायाने निर्दयतेने बांधुन चारा पाण्याची व्यवस्था न करता वाजवी कारणा शिवाय उपास मारीने व्याकुळ होतील अशा स्थितीत दोरीने क्लेशदायकपणे 12 गाय किमत 84,000/—रू. आणी एक गोरा कंमत 6,000/—रू. असा एकुण 13 जनावरे एकुण किमत 90,000/—रू. चे गौवंश रूपये चा माल अज्ञात आरोपीने जनावरांना निर्दयतेने एकत्र बांधलेले मिळुन आले.

सदर प्रकरणी सरकार तर्फे सहायक फौजदार शमराव चौधरी, पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11(1),11(1)(एफ)11(1)(एच),11(1)(आय) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक काद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार जंगवाड 8329948101 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कुही :— अंतर्गत 25 कि. मी. अंतरावरील मौजा चांपा येथे दिनांक 20/07/2021 चे 13.10 वा. दरम्यान फिर्यादींना गुप्त बातमीदारमार्फत मिळालेल्या खबरेवरून आरोपी नामे— निसार वल्द जहीर कुरेशी वय 39 वर्ष रा. बडा ताजबाग नागपुर याच्या मालकीचा मौजा चांपा शिवारातील निसार फुड ॲन्ड फन धाब्यावर गेले असता सदर ठिकाणी गौवंश जातीचे गाय, बैल, बछडे असे एकुण 36 जनावरे किमती 3,58,000/—रू. चे आरोपीच्या धाब्याच्या मागे झाडाला बांधुन ठेवलेले मिळाल्याने नमुद आरोपीतास जनावराबाबत विचारपुस करून कायदेशीर दस्तऐवजाची मागणी केली असता असमाधान कारक उत्तर दिले.

सदर प्रकरणी सरकार तर्फे सुचिता मंडावले, पो.स्टे. कुही यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे वरील आरोपीविरुध्द कलम 5, 5 (अ) प्राण्याचा छळ प्रतिबंधक अधिनियम काद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार विजय कुंमरे मो.न 9823971453 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर